# प्रेसनोट दि २४/०५/२०१८

## विमानतळ पो.स्टेचे पोलीसांकडुन अट्टल मोटारसायकल चोरास अटक

गेले काही दिवसांमध्ये विमानतळ पोलीस स्टेशन- कार्यक्षेत्रात मोटारसायकल चोरांना आळा बसण्याकरीता विमानतळ पो.स्टे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री संजय नाईकपाटील व पोलीस निरीक्षक, गुन्हे श्री विलास सोंडे यांनी योग्य त्या सुचना देऊन त्यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे अधिकारी सहा. पोलीस निरीक्षक श्री एम आर खोकले यांनी त्यांचेकडे पोलीस कर्मचारी यांचे करवी मोटारसायकल चोरटयांचा शोध घेणेकामी मोहिम राबविण्यात आली. सदर मोहिमेदरम्यान दि २१/०५/२०१८ रोजी पोलीस स्टेशनचे पोलीस नाईक संजय आढारी व पोलीस कॉन्टेबल हरुन पठाण हे लोहगाव भागामध्ये साध्या वेशात फिरत असताना लोहगाव वाघोली रोड, पवार वस्ती या ठिकाणी एक संशयीत पल्सर मोटारसायकल नं एमएच ४५ डब्ल्यु ४५८१ हि जाताना दिसली त्यावर त्यांनी सदर मोटारसाकल स्वाराचा पाठलाग करुन त्यास ताब्यात घेऊन त्याचेकडील मोटारसायकलबाबत माहिती घेता त्याने उडवा उडवीची उत्तरे दिली. त्यास त्याचा नाव पत्ता विचारता त्याने स्वताचे नाव राहुल राम सरवदे वय १९ वर्षे रा पठारे वस्ती, विट भट्टीचे बाजुला, लोहगाव, असे सांगितले. सदर पल्सर मोटारसायकल बाबत अधिक माहिती घेता सदरची पल्सर मोटारसायकल हि दि ०१/०५/२०१८ रोजी लोहगाव भागातुन चोरी गेली होती व त्याबाबत विमानतळ पोलीस स्टेशन येथे गु.र.नं १५६/१८ भा.दं.वि कलम ३७९ अन्वये गुन्हा दाखल आहे. त्यावरुन राहुल राम सरवदे यास पोलीस स्टेशन येथे आणुन त्याचेकडे सखोल तपास करता त्याने सदरची पल्सर मोटारसायकल हि चोरी केल्याचे कबुल केले. सदर आरोपीस गु.र.नं १५६/१८ यामध्ये दि २१/०५/२०१८ रोजी २०.१५ वा अटक करण्यात आली आहे.

सदर अटक आरोपीकडे तपास करता त्याने त्याचे दोन अल्पवयीन साथीदार यांचे मदतीने आणखी ३ मोटारसायकली यांच्या चो-या केल्याचे कबुल केले. यातील आरोपीकडुन ४ मोटारसायकल १) पल्सर एमएच ४५ डब्ल्यु ४५८१ २) एव्हेजेंर एमएच १२ सीपी २००३ ३) पॅशन एमएच १२ ईवाय ३०६८ ४) एमएच १२ सीई २८८८ अश मोटारसायकली जप्त करण्यात आलेल्या आहे. असुन त्यापैकी सदरची एक मोटारसायकलबाबत येरवडा पोलीस स्टेशन गु.र.नं १९४/१८ भा.दं.वि कलम ३७९ अन्वये गुन्हा दाखल आहे. आणखी दोन मोटारसायकलबाबत काही गुन्हा दाखल आहे काय? याबाबत तपास चालु आहे.

सदरची कामगिरी पोलीस निरीक्षक, गुन्हे श्री विलास सोंडे यांचे मार्गदर्शनाखाली सहा. पोलीस निरीक्षक एम.आर खोकले, पो.हवा विजय सांवत, मोहन काळे, अशोक आटोळे, पोलीस कर्मचारी संजय आढारी, हरुन पठाण, राहुल मोरे, विनोद महाजन, सचिन भिंगारदिवे, प्रशांत कापुरे, मारुती वाघमारे यांनी केलेली आहे.